आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१५ मार्च २०२४ - शुक्रवार

आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याकरता केंद्रीय निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद उद्या दुपारी नवी दिल्ली इथं होणार आहे. काही राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रमही यावेळी जाहीर होईल. या पत्रकारपरिषदेचं थेट प्रक्षेपण समाजमाध्यमांवर करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक आयोगानं एक्स समाज माध्यमावर दिली आहे. नवनियुक्त निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीरसिंग संधू यांनी आज पदभार स्वीकारला. निर्वाचन सदन या मुख्य निवडणूक कार्यालयात मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी या दोघांचं स्वागत केलं. केंद्रीय निवडणूक आयोगानं निवडणूक रोख्यांची माहिती आपल्या संकेतस्थळावर प्रकाशित केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार निवडणूक रोख्यांची सर्व माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाला स्टेट बँकेनं परवा म्हणजे १३ तारखेला दिली. १२ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान खरेदी झालेल्या आणि वटलेल्या निवडणूक रोख्यांची माहिती बँकेनं दिली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या कापड गिरण्यांमधल्या, कोविड काळात अर्ध्या पगारावर काम करणाऱ्या कामगारांच्या पगाराची देणी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज मुंबईत दिली. ऑगस्ट -२२ पर्यंतची उर्वरित ५० टक्के देणीही येत्या ३० ते ४० दिवसात चुकती केली जातील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान निधीत नऊ हजार रुपयांची भरीव वाढ करून हा निधी वीस हजार रुपये करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. अनेक पत्रकार आणि पत्रकार संघटनांनी केलेल्या मागणीनंतर हा निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्री कार्यालयाच्या पत्रकात म्हटलं आहे.

राज्यातल्या अधिस्वीकृतीधारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांना सध्या दर महिन्याला ११ हजार रुपये सन्मान निधी मिळतो. गेल्या वर्षी मार्चमध्येच हा निधी ३५ कोटींवरून वाढवून ५० कोटी करण्यात आला.

**<><><><><>**

'उडान' योजने अंतर्गत नांदेड विमानतळावरून अहमदाबाद, हैद्राबाद तसंच जालंधरला जाणाऱ्या विमानसेवेला येत्या ३१ मार्च पासून नियमितपणे सुरुवात होणार आहे. खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी ही माहिती दिली. अहमदाबाद आणि हैद्राबादला जाणारी विमानसेवा आठवड्यातून चार दिवस उपलब्ध राहील, असं त्यांनी संगितलं.

**<><><><><>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भांडूप जलशुद्धीकरण केंद्रातल्या जलशुद्धीकरण प्रक्रिया टाक्या स्वच्छ करण्याची कामे सध्या हाती घेण्यात आली आहेत. या कामांमुळे मुंबईच्या पाणीपुरवठ्यात येत्या 24 एप्रिल पर्यंत पाच टक्के कपात केली जाईल अशी माहिती महापालिकेने दिली आहे.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात येत्या उन्हाळ्यातली संभाव्य पाणीटंचाई आणि दुष्काळसदृष्य परिस्थिती लक्षात घेऊन सोलापूर महानगरपालिका तसंच जिल्ह्यातल्या सर्व

नगरपालिका क्षेत्रातल्या उपाययोजनांसाठी एकूण 10 कोटी 79 लाख रुपये निधी मंजूर झाला आहे.

<><><><><><>

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेला आजपासून नागपूरमधे  रेशीम बाग इथं डॉ. केशव हेडगेवार स्मृती मंदिरात प्रारंभ झाला. संघाच्या संकेतस्थळावर २०१७ ते २०२३ पासून प्रतिवर्षी एक लाख पेक्षा जास्त सदस्यत्वासाठी नोंदणीचे अर्ज आले आहेत, अशी माहिती सहसरकार्यवाह डॉ. मनमोहन वैद्य, आज नागपूर मध्ये पत्रकार परिषदेत दिली.  सुमारे  पंधराशेच्या वर प्रतिनिधी या तीन दिवसीय प्रतिनिधी संमेलनाला उपस्थित राहणार आहेत.

<><><><><><>

पुण्यात गंगाधाम भागात एका गॅरेजमध्ये आज पहाटे अचानक लागलेल्या आगीत १७ गाड्या जळून गेल्या. स्थानिक रहिवाशांना ही आग लागल्याचं पहाटे ३ च्या सुमारास लक्षात आलं, त्यावेळी त्यांनी अग्निशामक दलाला पाचारण केलं. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही .  आगीचं कारण अद्याप कळलेलं नाही.

<><><><><><>

रत्नागिरीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचं आणि पोलीस वसाहतीच्या नवीन इमारतीचं भूमिपूजन काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. स्वातंत्र्यवीर सावरकरांना ज्या कोठडीत ठेवलं

होतं, त्या कोठडीचं सुशोभीकरण आणि मजबुतीकरण करण्याच्या कामाचं भूमिपूजनही यावेळी फडनवीस यांच्या हस्ते झालं.

**<><><><><><>**

बुलडाणा जिल्ह्यात प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेमुळे एका दिव्यांग व्यक्तीला अन्नधान्य मोफत मिळालं त्याचा कुटुंबाला कसा लाभ झाला ...याविषयी लाभार्थी वसंता घारोड म्हणाले. याबद्दल वसंता घारोड यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड बाईट…**

**//<><><><><><>//**